# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**फळबागांवर दुष्काळाचे सावट निर्माण झाल्याबाबत**

**(१) १२०१९ (२१-१२-२०१५). ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीचे ठरवून दिलेले जवळपास ९० टक्के उद्दिष्ट पूर्ण केले जात होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील फळबागांवर दुष्काळाचे सावट आल्यामुळे गेल्या सात वर्षात रोहयोतील फळबाग लागवडीचे क्षेत्र सुमारे ८० हजार ८३२ हेक्टरने घटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, रोहयो अंतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान झाले आहे त्या शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करुन त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२७-०९-२०१६) :** (१), (२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे.

रोहयो अंतर्गत फळबाग लागवडीकरीता मागील ७ वर्षात एकूण २,३८,२०० हेक्टर लक्षांक देण्यात आला होता. त्यापैकी १,८९,१४०.६० हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत देखील, मागील ७ वर्षात ५१०६२ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आलेली आहे.

दुष्काळसदृश्य परिस्थितीत बहुवार्षिक फळपिके वाचविण्याकरीता, सन २०१२-१३ मध्ये, राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामधून राज्यात एकुण रुपये ६४४.२५ कोटी निधी व सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत रुपये ५० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच फळबागांना लागणाऱ्या पाण्याच्या साठवणूकीसाठी, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजना या अंतर्गत सन २०१४-१५ मध्ये एकूण ४०७१ सामुहिक शेततळ्यांसाठी रुपये ७२.४२ कोटी व सन २०१५-१६ मध्ये २१८८ सामुहिक शेततळ्यांसाठी रुपये ३७.५४ कोटी निधी राज्यात वितरीत करण्यात आलेला आहे.

---

**राज्यातील शेतकऱ्यांच्या दुरवस्थेबाबत**

**(२) १४००८ (२१-१२-२०१५). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या दुरवस्थेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाकडे केलेल्या अपिलामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या मुद्द्यांची पडताळणी करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने शासनास सन २०१४-२०१५ दरम्यान आदेशीत केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळाची झळ पोहचलेल्या शेतकऱ्यांना रु. २५०००/- ची आर्थिक मदत तसेच शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणेची मागणी ही संबंधित शेतकऱ्यांने याच याचिकेत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती भूमिका मा.सर्वोच्च न्यायालयासमोर मांडली आहे,

(४) याबाबत थोडक्यात माहिती काय आहे ?

**श्री.चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. तथापि, रिट पिटीशन ८५७/२०१५ स्वराज्य अभियान वि. भारतीय संघराज्य व इतर यामध्ये राज्य शासनास प्रतीवादी करण्यात आले होते. त्यानुसार या प्रकरणी राज्य शासनाने शपथपत्र दाखल केले आहे.

(२) हे खरे नाही. तथापि पात्र आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७ दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये रुपये १,००,०००/- इतकी मदत देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पिकविम्याचे नियम बदलून आता सर्वकक्ष पीकविमा योजना लागू करण्याबाबत**

**(३) १४३१९ (२१-१२-२०१५). डॉ.अपूर्व हिरे :** तारांकित प्रश्न क्रमांक ९९४१ ला दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे वारंवार होणाऱ्या प्रचंड नुकसानीच्या पार्श्वभुमीवर नवीन पीक विमा योजना धोरण ठरविण्याच्या केंद्र शासनाच्यास्तरावर विचाराधीन असलेल्या बाबीवर केंद्र शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, योजनेचे सर्वसाधारण निकष काय आहेत व नवीन पीक विमा योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, नवीन पीक योजनेबाबत शासनाने कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-१०-२०१६) :** (१) होय.

(२) राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना ही खरीप हंगाम २०१६ पासून क्षेत्र हा घटक धरुन राबविण्यात येत आहे. या योजनेत राज्यातील सर्व जिल्ह्यांतील अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित केलेल्या तृणधान्य, कडधान्य, गळितधान्य व नगदी पिकांचा समावेश करण्यात आला असून योजना कर्जदार शेतकऱ्यांना बंधनकारक व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे.

योजनेअंतर्गत अधिसुचित पिकांचे सरासरी उत्पन्न व उंबरठा उत्पन्न यांच्या आधारे विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चित केली जाईल.

(३) प्रधानमंत्री पीक विमा योजना ही योजना खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात राबविणे करिता दिनांक ५ जुलै, २०१६ व १६ जुलै, २०१६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले असून राज्यातील सर्व जिल्ह्यांत योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

---

**विदर्भातील शासकिय वैद्यकीय व रुग्णालयांना देण्यात आलेल्या अनुदानाबाबत**

**(४) १५१९१ (२९-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील शासकिय वैद्यकीय व रुग्णालयांना आगामी वर्षात किती रुपये अनुदान देण्यात आले तसेच सदरहू अनुदानाचे वाटप कोणत्या आधारावर केले जाते,

(२) असल्यास, मागील वर्षात मुंबई स्थित जे जे हॉस्पिटलला देण्यात आलेले अनुदान व त्या तुलनेत नागपूर येथील शासकिय वैद्यकीय रुग्णालयांना दिलेले अनुदान ह्यात बरीच तफावत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदान कमी दिल्यामुळे त्याचा रुग्णसेवा, औषध व इतर साहित्य ह्यावर परिणाम होतो, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०७-१०-२०१६) :** (१) विदर्भातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांना सन २०१६-१७ करिता एकूण रुपये ५२३ कोटी ८ लाख इतके अनुदान उपलब्ध आहे. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना अनुदान मंजूर करताना संबंधित संस्थांची मागणी व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी शासनास सादर केलेला प्रस्ताव विचारात घेण्यात येतो. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने नियोजन विभाग तसेच वित्त विभागाने अंतिमत: स्वीकृत केलेल्या अनुदानाचे वाटप संबंधित संस्थांना करण्यात येते.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाने केलेल्या कर्ज वाटपाबाबत**

**(५) १५२३५ (२७-०४-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची समाजाच्या आर्थिक विकासाकरिता स्थापना केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात मंडळाकडे किती अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यापैकी किती लाभार्थींना व किती रक्कमेचे कर्ज वाटप झाले आहे तसेच वाटप केलेल्या कर्जाची व कर्मचारी यांच्या वेतनाची रक्कम किती आहे,
(३) नसल्यास, कर्ज वाटप न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१३-१०-२०१६) :** (१) होय. राज्यातील मातंग समाज व त्यांच्या १२ पोटजातीतील व्यक्तींच्या आर्थिक विकासाकरिता शासनामार्फत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.
(२) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास सन २०१४-१५ ते २०१५-१६ या कालावधीमध्ये अनुदान योजना व बीजभांडवल योजनेअंतर्गत एकूण १४९३२ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २१७१ लाभार्थींना एकूण रुपये ११५६.७१ लाख इतक्या रक्कमेचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. तसेच, सन २०१४-१५ मध्ये एकूण रुपये १०९९.८३ लाख व सन २०१५-१६ मध्ये एकूण रुपये ८६०.७६ लाख इतकी रक्कम महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च करण्यात आली आहे.
(३) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या कर्ज योजनांमध्ये कर्ज मंजूरी व वितरणास दिनांक ०२/१२/२०१४ ते दिनांक ०१/०३/२०१६ पर्यंत स्थगिती असल्यामुळे या कालावधीत कर्ज वितरण होऊ शकले नाही.

---

### राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी कामगार मंडळ स्थापनेबाबत

**(६) १६३७७ (२८-०४-२०१६). श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करणार असल्याचे आश्वासन मा.सहकार मंत्री यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याणकारी मंडळ स्थापनेची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, कल्याणकारी मंडळाच्या सभासद कामगार अंमलबजावणीचे धोरण कसे असणार आहे ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही, मा.मंत्री (सहकार) यांनी दिलेल्या आश्वासनाची शहानिशा करण्यासाठी संसदीय कार्य विभागाकडे तसेच विधानमंडळातील अभिलेख्यामध्ये शोध घेण्यात आला असता, असा प्रकारचे कोणतेही आश्वासन मा.मंत्री (सहकार) यांनी अधिवेशन कालावधीत दिल्याचे आढळले नाही.

(२) असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा मंडळ गठीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(३) सदर मंडळ गठीत झाल्यानंतर मंडळाद्वारे सुचविण्यात आलेल्या असंघटीत कामगारांसाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत निर्णय घेण्यात येईल.

---

### राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी कामगार मंडळ स्थापनेबाबत

**(७) १६४८८ (०३-०५-२०१६). श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि. रायगड) तहसीलदार कार्यालयाने तालुक्यातील मुख्याध्यापकांची बैठक घेऊन तालुक्यात केंद्र शासनाच्या आम आदमी विमा योजनेच्या शिष्यवृत्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेच्या अंमलबजावणीसाठी श्री. के. सी. शर्मा या नावाच्या व्यक्तीने नायब तहसीलदार दिपाली पुरारकर यांना दूरध्वनी करुन तुमच्या विभागात आम आदमी विमा योजनेबाबत विद्यार्थ्यांची माहिती संकलित करावयाची असल्याचे सांगितल्यावर दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मुख्याध्यापकांच्य बैठकीला येण्याचे श्री. शर्मा यांस सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बैठकीस उपस्थित राहून श्री. के.सी. शर्मा नावाच्या व्यक्तीने उपस्थित व्यक्तींना मार्गदर्शन केले तदनंतर त्याने तालुक्यातील शाळांमध्ये जावून एल.आय.सी. कार्यालयाच्या पावतीच्या आधारे ७५४ विद्यार्थ्यांकडून रुपये २०० प्रमाणे सुमारे रुपये ५ लाख ५० हजार ८०० इतकी रक्कम जमा केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा कार्यालयाकडून आर्युविमा कार्यालयाकडे श्री. शर्मा नावाच्या व्यक्तीबाबत चौकशी केली असता अशा कोणत्याही व्यक्तीची नेमणूकच करण्यात आली नसल्याचे स्पष्ट करण्यात आल्याने याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात के.सी. शर्मा नावाच्या तोतया एल. आय. सी. प्रतिनिधीच्या नावे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) श्री.के.सी. शर्मा हे सदर बैठकीस उपस्थित राहून आम आदमी विमा योजनेच्या शिष्यवृत्तीचे फॉर्म कसे भरावे याबाबत उपस्थित मुख्याध्यापक व त्यांचे प्रतिनिधी यांना मार्गदर्शन केले.

श्री.शर्मा यांनी एल.आय. सी. कार्यालयाकडून आल्याचे खोटे सांगुन विश्वास संपादन करुन उरण तालुक्यातील ९ शाळामध्ये जावून २७५४ विद्यार्थ्यांकडून प्रति विद्यार्थी २००/- रुपये प्रमाणे एकूण रक्कम रुपये ५,५०,८००/- जमा करून शाळांची व विद्यार्थ्यांची फसवणूक केली.

(४) व (५) रायगड जिल्हा कार्यालयाकडून आयुर्विमा महामंडळाकडे चौकशी केली असता श्री. शर्मा नावाची कोणीही व्यक्ती महामंडळाकडून नियुक्त करण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले. श्री. शर्मा यांनी एल. आय. सी. कार्यालयाकडून आल्याचे खोटे सांगून विश्वास संपादन करुन शाळांमधील विद्यार्थ्यांकडून प्रति विद्यार्थी २००/- रुपये प्रमाणे एकूण रक्कम रुपये ५,५०,८००/- जमा करून शाळेची, विद्यार्थ्यांची तसेच शासनाची फसवणूक केल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास आल्याने के.सी.शर्मा यांचे विरुध्द उरण तहसील कार्यालयाकडून उरण पोलीस ठाणे येथे गुन्हा. रजि. नं. १७/२१६ भादंवि ४२० दिनांक १६/०१/२०१६ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. तसेच गुन्हयाचे दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

---

## आकारी पड, अटी व शर्तींचा भंग, बेदखल कुळ अशा विविध कारणांमुळे शासन जमा झालेल्या जमिनी पुन्हा मूळ मालकांना परत करण्याबाबत

**(८) १६७७२ (२७-०४-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकारी पड, अटी व शर्तींचा भंग, बेदखल कुळ अशा विविध कारणांमुळे शासन जमा झालेल्या जमिनी पुन्हा मूळ मालकांना परत करण्याबाबतचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे, उक्त निर्णयाचा लाभ साधारण: किती नागरीकांना होणार आहे व उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :** (१) व (२) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम-१८२ मध्ये असलेल्या तरतूदीमुळे राज्यात जप्त करण्यात आलेल्या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर आकारी पड म्हणून नोंदी झाल्यापासून १२ वर्षाचा कालावधी झाला तरी, काही जमिनी संबंधित शेतकऱ्यांच्या ताब्यात आहेत, तर काही जमिनी शासनातर्फे अभिकर्ते नियुक्त करुन त्यांच्या वहिवाटीखाली आहेत. अशा जमिनी विकास प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यासाठी व संबंधित शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम-१८२ मध्ये सुधारणा करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यासंबंधी सुधारणा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७/२०१६ अन्वये करण्यात आली आहे.

तसेच महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या सांविधिक तरतुदींचा भंग झाल्यानंतर दंड आकारुन शेतजमीन हस्तांतरण विधीग्राहय उक्त अधिनियमामध्ये सुधारणा सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२० अन्वये करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयात खरीप अनुदानपोटी बाधीत शेतकऱ्यांच्या गाव व जिल्हानिहाय यादी तयार करण्याबाबत**

**(९) १८८३२ (२७-०४-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात खरीप अनुदानपोटी शेतकऱ्यांना वाटप करावयाचा रूपये १०७ कोटी २८ लाखाचा निधी प्राप्त झाला असून सदर अनुदान निधी शेतकऱ्यांच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या खात्यात दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी जमा होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्धारीत वेळेत बाधित शेतकऱ्यांच्या गाव व जिल्हानिहाय याद्या तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) औरंगाबाद जिल्हयासाठी खरीप २०१५ करिता बाधीत शेतकऱ्यांना अनुदानापोटी एकूण रुपये १०७.२८ कोटी इतके अनुदान देण्यात आले होते. सदर अनुदान वाटपासाठी बाधीत शेतकऱ्यांच्या गाव निहाय याद्या तयार करुन, अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अन्न व औषध प्रशासनाने कुल जारलाही बाटली बंद बॉटलच्या कक्षेत आणण्याचा निर्णय घेतल्याबाबत**

**(१०) १९३१६ (२३-०८-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात लग्नसमारंभासह इतर विविध कार्यक्रमात कुल जारमधून पुरविलेल्या पिण्याच्या थंड पाण्यात मोठया प्रमाणात बॅक्टोरिया असल्याने यावर अंकुश ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने कुल जारलाही बाटली बंद बॉटलच्या कक्षेत आणण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील निर्णयाची अदयापही राज्यात अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील इसापूर धरणासाठी जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(११) १९३२३ (१९-०८-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील इसापूर धरणासाठी सुमारे ३४ वर्षापूर्वी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी व घरे संपादित करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इसापूर धरणाच्या परिसरात पुनर्वसनासाठी जागा निश्चित करून देखील विस्थापित शेतकऱ्यांचे पूर्णत: पुनर्वसन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संपादीत करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१०-२०१६) :** (१) होय.

(२) हे खरे नाही. इसापूर धरणामुळे बाधीत सर्व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे. तसेच नागरी सुविधांची कामे पूर्ण करुन सदरील कामे संबंधीत ग्रामपंचायत व पंचायत समितीकडे हस्तांतरीत केलेली आहेत. जमिनीचा मावेजा पूर्णत: वाटप करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गिरणा प्रकल्पातील (जि.नाशिक) पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याबाबत**

**(१२) १९३८२ (१९-०८-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** तारांकित प्रश्न क्रमांक ९४०१ ला दिनांक २३ जुलै,२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणा प्रकल्पातील (जि.नाशिक) सन १९७६ पूर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी शासनाकडे मान्यतेसाठी पाठविलेली अंदाजपत्रके नियोजन विभागाच्या मूल्यमापन समितीच्या शिफारशीसाठी प्रदीर्घ काळापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंदाजपत्रकांना मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर अंदाजपत्रकांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. मा.मुख्य सचिव महोदयांच्या दिनांक ११/०४/२०१४ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार, सन १९७६ पुर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांतील नागरी सुविधांसाठी पुरेसा नियतव्यय उपलब्ध होत नसल्यामुळे सदर योजनेच्या मुल्यमापनाचा प्रस्ताव नियोजन विभागास मुल्यमापन समितीच्या शिफारशीसाठी सादर करण्यात आला होता. तसेच, सन १९७६ पूर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवायच्या नागरी सुविधांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास असल्याने सदर अंदाजपत्रके नियोजन विभागाच्या मूल्यमापन समितीच्या शिफारशीस पाठविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे आहे.

(३) नियोजन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार योजनांतर्गत योजनेचा आढावा घेवून सन २०१४-२०१५ मध्ये मुल्यमापन समितीस प्रस्ताव सादर करण्यात आला होता, त्यामुळे तसेच पुरेशा निधीअभावी त्या कालावधीत पुनर्वसनाच्या नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली नव्हती. तथापि आता सन २०१६-१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त परंतु जुन्या दरसुचीवर अधारित असलेली अंदाजपत्रके चालू दरसुचीवर परिगणित करुन फेरसादर करण्याचे निदेश प्रकल्पयंत्रणेस देण्यात आले आहेत. प्रकल्पयंत्रणेकडून सुधारित दरसुचीनुसार अंदाजपत्रके प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात स्वच्छतागृहांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**(१३) १९३८८ (२३-०८-२०१६). श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधण्यात येणा-या स्वच्छतागृहांना प्रशासकीय मान्यता मिळविण्यासाठी मंगळवेढा पंचायत समितीकडे ग्रामीण भागातील लाभार्थींनी सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन व विनंती अर्ज देऊन बरेच दिवस होऊनही मान्यता देण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, विलंब करणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्याच्या सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत आराखड्यामध्ये १४ गावे मंगळवेढा तालुक्यातील असून त्यांचे उद्दिष्ट ३१३१ आहे. माहे एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ अखेर प्रशासकीय मान्यतेसाठी १३५ प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सोलापूर यांचे कार्यालयात प्राप्त झाले असून १०२ प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. कामे पूर्ण झालेल्या शौचालयांची देयके अदा करण्यात आलेली आहेत. प्रोत्साहन अनुदान लाभार्थींची रक्कम त्यांचे बँक खात्यावर जमा केलेली आहे. ३३ अर्जदारांनी अपूर्ण प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सोलापूर यांच्या कार्यालयाकडे प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केल्यामुळे कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत संबंधित ग्रामसेवकांना कळविलेले आहे. प्राप्त प्रस्तावापैकी पात्र असलेल्या प्रस्तावांवर वेळीच कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे पात्र प्रस्तावांना मान्यता देण्यास विलंब झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संरक्षित व्याघ्र प्रकल्पा शेजारील नगरपरिषदांना विशेष बाब म्हणून अत्याधुनिक आगरोधक यंत्र, फायर शुट, अग्निशामक वाहने देण्याबाबत**

**(१४) १९४६४ (११-०८-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जंगल क्षेत्रात आग लागून नागरी वसाहतीत जीवित व वित्त हानी होण्याच्या घटना सन २०१६ च्या उन्हाळ्यात वाढलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी चाळीस ते पन्नास टक्के वन संपदेचे नुकसान व नागरी वस्तीत वित्त व जीवित हानी केली असूनही वन विभागाकडे अत्याधुनिक आग नियंत्रण यंत्रणा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या वणव्यांमुळे जंगलातील जैवविविधता व नैसर्गिक समतोल यांना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संरक्षित व्याघ्र प्रकल्पा शेजारील नगरपरिषदांना विशेष बाब म्हणून अत्याधुनिक आगरोधक यंत्र, फायर शुट, अग्निशामक वाहने आदिंनी सुसज्ज करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यात वनक्षेत्रात लागलेल्या आगीमुळे नागरी वस्तीत वित्तीय व जिवित हानी झालेली नाही. जानेवारी, २०१६ ते जून, २०१६ या कालावधीत एकूण ४३९७ आगीच्या घटना घडलेल्या असून ३४४७९ हेक्टर वनक्षेत्र जळीत झाले आहे. जळीत क्षेत्र एकूण वनक्षेत्राच्या ०.५६% आहे. यामध्ये केवळ पालापाचोळा जळालेला आहे.

जंगलाचे वणव्यापासून रक्षण करण्याकरिता पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातात :-

- सन २०११-२०१२ मध्ये ११ मोबाईल व्हन व ११ फायर फायटीग युनिट वनवृत्ताला वाटप करण्यात आले आहे.
- ३७८ पोर्टेबल फायर ब्लोअर खरेदी करुन वाटप करण्यात आले आहेत.
- वनरक्षकांना ६५४२ PDA/Smart Phone देण्यात आले असून त्यावर आगीच्या मोसमात NRSA हैद्राबाद संस्थेकडून वनक्षेत्रास आगीबाबत धोका झाल्यास तात्काळ इशारा (Alerts) दिला जातो.
- आधुनिक तंत्रज्ञानाने आगीवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- दरवर्षी वन विभाग स्तरावर आग प्रतिबंधात्मक आराखडा तयार करण्यात येतो. या आराखड्यानुसार उपलब्ध मंजूर अनुदानाचे अधिन राहून दरवर्षी १५ फेब्रुवारी पुर्वी जाळरेषा घेण्यात येतात. तसेच अग्निरक्षकाची नेमणूक करण्यात येते.
- आग प्रतिबंधक पथके गठीत करण्यात येऊन वनक्षेत्रास आग लागल्याचे निदर्शनास येताच स्थानिक गावकऱ्यांचे सहाय्याने आग विझविण्यात येते.
- ग्रामसभा घेऊन आगीमुळे होणाऱ्या नुकसानीची माहिती स्थानिक गावकऱ्यांना देऊन त्याचे प्रबोधन करण्यात येते. तसेच भिंतीपत्रके व पत्रकाद्वारे आणि दुरदर्शन/आकाशवाणी सारख्या प्रसार माध्यमाद्वारे स्थानिक ग्रामसंस्थामध्ये जागरुकता निर्माण करण्यात येते.
- आकाशवाणीवर वनवणव्याबाबत जिंगल्स जाहिराती प्रसारित केल्या जातात.
- संयुक्त वन व्यवस्थापन व वनसंरक्षण समित्यांचे सहकार्य घेण्यात येते.
- राज्यातील नागपूर, ठाणे, धुळे, चंद्रपूर व अमरावती वनवृत्तात आणि १० संरक्षित वनक्षेत्रात बिनतारी संदेश यंत्रणेचे जाळे उभारण्यात आले असून वनवणव्याच्या हंगामात संदेशाची देवाण-घेवाण करण्यासाठी ही यंत्रणा अतिशय उपयुक्त ठरते.

(३) हे खरे नाही.

(४) याबाबत शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**राज्यातील जनतेला पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी मिळण्याबाबत**

**(१५) १९६५३ (२३-०८-२०१६). श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.संदिप बाजोरिया, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनतेला पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी मिळावे याकरिता एक सर्वकष योजना राबविण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या योजनेकरिता किती खर्च येणार आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील ग्रामीण भागातील दीर्घकालीन गरजांचा व आरोग्याचा विचार करुन ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षासाठी "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून हा कार्यक्रम प्रामुख्याने खालील तीन प्रकारात राबविण्यात येणार आहे.

(अ) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना.

(ब) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन.

(क) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती.

(३) सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षाच्या कालावधीत या कार्यक्रमासाठी रुपये २५३०.८६ कोटीची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

---

**चंद्रपूर जिल्हयात उद्योगांमुळे होत असलेले प्रदुषण**

**(१६) २००७२ (२३-०८-२०१६). श्री.प्रकाश गजभिये, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील चार भागातील उद्योग बंदी हटविल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून सदर जिल्हा देशात ६ व्या क्रमांकावर असून दोन कृती आराखडे असूनही जिल्ह्यातील प्रदूषण कमी झाले नसल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात महाऔष्णिक विद्युत केंद्रामुळे ७८ टक्के धुलीकरण, सिमेंट उद्योगामुळे १८ टक्के व इतर उद्योगामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याने नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रदूषणावर आळा घालण्यासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना व उद्योगावर प्रतिबंधात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. रामदास कदम (०५-१०-२०१६) :** (१), (२) व (३) चंद्रपूर जिल्ह्यात प्रदूषणाचे एकूण प्रमाण विचारात घेता, डिसेंबर, २००९ मध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या सर्वेक्षणानुसार समग्र पर्यावरण प्रदूषण मूल्यांकन ८३.८८ एवढे होते. याबाबत कृति आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करुन प्रदूषणाचे प्रमाण कमी झाले असून सन २०१६ मध्ये समग्र पर्यावरण प्रदूषण मूल्यांकन ५४.४२ आला आहे. सर्वसमावेशक प्रदूषणविषयक कृति आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नविन तहसिल कार्यालयांची निर्मिती करण्याबाबत**

**(१७) २०१२७ (१६-०८-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** तारांकित प्रश्न ७३८५ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नविन तहसिल कार्यालयांची निर्मिती करण्यासाठी सर्व विभागीय आयुक्तांची समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनास सादर करुन प्रदिर्घ कालावधी होऊनही छाननीचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बोरगांव मंजू येथे स्वतंत्र तहसिलदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, नविन तहसिल कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-१०-२०१६) :** (१), (२), (३), (४) व (५) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत शासन निर्णय दिनांक १५/११/२०११ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांचे सविस्तर अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सर्व विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका विभाजनाचे निकष निश्चित करुन प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत गुणवत्तेनुसार उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

## राज्यातील पाणी पुरवठा योजनांच्या निर्मितीला गती देण्यासाठी स्वतंत्र मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याबाबत

**(१८) २०१४९ (२३-०८-२०१६). श्री.जगन्नाथ शिंदे :** तारांकित प्रश्न क्रमांक १८५७९ ला दिनांक ५ एप्रिल,२०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या धर्तीवर राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या निर्मितीला गती देण्यासाठी राज्यात स्वतंत्र मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू स्वतंत्र मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, सदरहू कार्यक्रमाची सुरूवात प्रत्यक्षात केव्हापासून होणार आहे व त्यासाठी एकूण किती कोटी रूपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(३) सदरहू कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजना बळकट करण्याच्या दृष्टीने गावाची निवड करताना कोणकोणते निकष लावण्यात आलेले आहेत,
(४) तसेच विविध कारणास्तव बंद असलेल्या ८३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरूज्जीवीत करण्यात येणार आहेत काय ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :** (१) होय.
(२) राज्यातील ग्रामीण भागातील दिर्घकालीन गरजांचा व आरोग्याचा विचार करुन ग्रामीण जनतेस पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता सन २०१६-१७ ते २०१९-२० या चार वर्षासाठी “मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम” राबविण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ७ मे, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम प्रामुख्याने खालील तीन प्रकारात राबविण्यात येणार आहे.

(अ) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या नवीन योजना
(ब) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन
(क) प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती.
या कार्यक्रमासाठी एकूण रुपये २५३०.८६ कोटीची चार वर्षासाठी तरतूद करण्यात आली आहे.

(३) सन २०१५-१६ या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या कृती आराखड्यामध्ये समावेश केलेल्या गावे/वाड्यांपैकी, मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमामध्ये योजनांसाठी एक हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे/वाड्यांचा समावेश करण्यात आला आहे.
(४) होय.

---

**सोलापूर येथील विडी कामगारांचे प्रश्न सोडविण्याबाबत**

**(१९) २०३६३ (२३-०८-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे अन्नसुरक्षा कायद्याखाली विडी कामगारांना धान्य पुरवठा करण्याचे आदेश शासनाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विडी उद्योगास मारक ठरणाऱ्या धुम्रपानविरोधी कायद्यातील जाचक अटी शिथिल कराव्या अशी मागणी विडी कारखानदार व कामगारांची असून सदरील अटी शिथिल करण्याबाबतची याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्यामुळे विडी उद्योग बंद होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विडी उद्योग बंद पडल्यास सोलापूरातील ७० हजार विडी कामगारांच्या संपूर्ण रोजगारावर गदा येणार असून या कामगारांमध्ये ९० टक्के महिलांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संपूर्णत: रोजगाराभिमुख असलेला विडी उद्योग आणि त्यावर आधारलेल्या कामगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०७-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) हे खरे आहे.

सदर अधिसूचनेच्या अंमलबजावणीच्या विरोधात सोलापूरातील विडी कारखानदारांनी दिनांक ०१/०४/२०१६ ते ३०/०४/२०१६ या कालावधीकरिता विडी कारखाने बंद ठेवले होते. मा.सर्वोच्च न्यायालयातील विडी उद्योग संघाकडून दाखल केलेल्या याचिकेवरील दिनांक ०४/०५/२०१६ रोजीच्या निर्णयानुसार सदरची याचिका मा.उच्च न्यायालय, कर्नाटक यांचेकडे वर्ग केल्यानंतर विडी कारखानदारांनी दिनांक १५/१०/२०१४ रोजीच्या अधिसूचनेतील तरतुदींची अंमलबजावणी करुन विडी कारखाने पूर्ववत सुरु केले आहेत. तसेच, दिनांक १८/०४/२०१६ रोजी मा.पालकमंत्री महोदय, सोलापूर यांच्याकडे झालेल्या बैठकीत आस्थापना बंद ठेवू नयेत, अशा सूचना व्यवस्थापनाला देण्यात आल्या आहेत.

---

**कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र-राज्य हिश्याच्या ६०:४० या बदललेल्या सुत्रानुसार अंमलबजावणी करण्याबाबत**

**(२०) २०४५८ (१२-०८-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र-राज्य हिश्याच्या ६०:४० या बदललेल्या सुत्रानुसार अंमलबजावणी करण्याबाबतचा निर्णय दिनांक १० मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे व त्याची अंमलबलावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) उक्त निर्णयामध्येकृषि विभागाच्या कोणत्या योजनांचा समावेश आहे व केंद्र-राज्य हिश्याची किती रक्कम असणार आहे ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०५-१०-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र-राज्य हिश्याच्या ६०:४० या बदलेल्या सुत्रानुसार अंमलबजावणी करण्याबाबतचा निर्णय दिनांक १८ मे, २०१६ रोजी घेण्यात आला आहे.

कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत योजनांच्या केंद्र-राज्य हिश्याच्या प्रमाणात बदल होवून सदर योजना केंद्र-राज्य ६०:४० टक्के या प्रमाणात व सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अशा प्रवर्गनिहाय राबविल्यास सन २०१५-१६ पासून मान्यता शासनाने दिलेली आहे.

(३) दिनांक १८ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेल्या योजनांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे व या योजनांसाठी केंद्र-राज्य हिश्याची रक्कम ६०.४० या प्रमाणात असणार आहे.

**विवरणपत्र**

| अ.क्र. | योजनेचे नांव |
|---|---|
| १ | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान |
| २ | राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान (NMOOP ) |
| ३ | प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत-प्रति थेंब अधिक पिक योजना |
| ४ | अवर्षणप्रण क्षेत्र विकास कार्यक्रम (RADP ) |
| ५ | मृद आरोग्य व्यवस्थापनांतर्गत मृद आरोग्य पत्रिका |
| ६ | कृषी यांत्रिकीकरण उपअभियान (SMAM ) |
| ७ | कृषी विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा अंतर्गत सहाय्य ( आत्मा ) |
| ८ | बियाणे व लागवड साहित्य उपअभियान |
| ९ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान -राष्ट्रीय फलोत्पादन अभियान |
| १० | राष्ट्रीय आयुष अभियान- औषधी वनस्पती घटक |
| ११ | कृषी उन्नती योजना-राष्ट्रीय कृषि विकास योजना |

___________

**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) परिपत्रकानुसार प्राध्यापकांना नेट, सेट आणि पीएचडी करणे बंधनकारक केल्याबाबत**

**(२१) २०४६४ (२३-०८-२०१६). : श्री.संजय दत्त, श्री शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) परिपत्रकानुसार प्राध्यापकांना नेट, सेट आणि पीएचडी करणे बंधनकारक केले आहे तसेच सेवाकाळात करिअर ॲडव्हान्स स्कीमनुसार अन्य लाभ देण्याचेही निदेश देण्यात आले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदेशानुसार आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने नुकतेच एकूण ५ हजार २६० पैकी सुमारे २ हजार ८७७ अपात्र प्राध्यापकांना शैक्षणिक अर्हता पूर्ततेशिवाय कायम न करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्राध्यापकांची बाजू मा.सर्वोच्च न्यायालयात मांडण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२०८२/२०१३ व इतर समान विषयाच्या याचिकांमध्ये दिनांक २३ डिसेंबर, २०१५ रोजी एकत्रित निर्णय दिलेला आहे.

(३) वर नमूद केलेल्या दिनांक २३ डिसेंबर, २०१५ च्या निर्णयाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात अनेक विशेष अनुमती याचिका दाखल झालेल्या असून सद्य:स्थितीत प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शैक्षणिक कार्यालयासाठी मौलाना आझाद संस्थेला दिलेल्या जागेवर पंचतारांकित हॉटेल (ताज) आणि (डीमार्ट) सारखे उपक्रम सुरु असल्याबाबत**

**(२२) २०५८४ (१९-०८-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शैक्षणिक कार्यालयासाठी मौलाना आझाद संस्थेला दिलेल्या जागेवर पंचतारांकित हॉटेल (ताज) आणि (डीमार्ट) सारखे उपक्रम सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरातील मौलाना आझाद शैक्षणिक संस्थेसाठी १९६१ साली राज्य वक्फ मंडळाची २०४ एकर जागा ९९ वर्षाच्या कराराने देण्यात आली जागा देतांना त्याचा

उपयोग केवळ शैक्षणिक कामासाठीच करावा अशी अट टाकण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असतानाही त्या जागेचा उपयोग व्यापारीकरणासाठी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जागेचा बेकायदेशीर होणारा व्यापारी उपयोग रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) होय.
(४) व (५) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून सदर प्रकरणाची चौकशी केली असता सिडको प्रशासनाने वक्फ मंडळाची परवानगी न घेता हॉटेल ताज आणि डीमार्ट सारखे उपक्रम सुरु करण्यासाठी परवानगी दिली असल्याची बाब वक्फ मंडळाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे वक्फ मंडळाने सिडको प्रशासन आणि अध्यक्ष/सचिव, मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटीला नोटीस देवून सुनावणीसाठी बोलाविले आहे. या प्रकरणी काही सुनावण्या झाल्या असून अद्याप सुनावणीची कार्यवाही सुरु असल्याचा अहवाल वक्फ मंडळाने सादर केला आहे.

---

## औरंगाबाद शहरातील बार्टीच्या युपीएससी प्री कोचिंग सेंटर मधील विद्यार्थ्यांना अन्न विषबाधा झाल्याबाबत

**(२३) २०६६९ (२३-०८-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील कॅनॉट प्लेस सिडको बार्टीच्या युपीएससी प्री कोचिंग सेंटर मधील विद्यार्थ्यांना वेळोवेळी अन्न विषबाधेला सामोरे जावे लागत असून यासंदर्भात तक्रार करूनही सुधारणा होत नसल्याने विद्यार्थ्यांनी मेसवर बहिष्कार घातला असल्याचे दिनांक २६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याने स्वत:च्या उत्पन्नात वाढ करुन अनावश्यक तसेच**
**अनुत्पादक खर्च आटोक्यात आणण्याबाबत**

**(२४) २०७४३ (१८-०८-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक नागरिकांना २१ हजार रुपयांचे कर्ज असल्याचे कॅगने म्हटल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याने स्वत:च्या उत्पन्नात वाढ करुन अनावश्यक तसेच अनुत्पादक खर्च आटोक्यात आणण्याचे या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने कॅगच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे कर्जभार कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-१०-२०१६) :** (१) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल (३१ मार्च, २०१५ रोजी संपलेले वर्ष) या अहवालात दरडोई कर्जाची रक्कम सन २०१४-१५ मध्ये रुपये २१,१२५.८९ इतकी नमूद केली आहे.

(२) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल (३१ मार्च, २०१५ रोजी संपलेले वर्ष) या अहवालात "साधनातील दरी सांधण्यासाठी राज्याने त्यांच्या स्त्रोतांना चालना देण्यात सुधारणा करावी तसेच अनुत्पादक खर्चास लगाम घालावा" असे नमुद केले आहे.

(३) राज्याचे उत्पन्न वाढण्यासाठी कर व करेतर महसुलात वाढ करण्याबाबत वेळोवेळी मा.मुख्यमंत्री/सचिव स्तरावर आढावा घेऊन सुचना दिल्या आहेत. अनावश्यक तसेच अनुत्पादक खर्च कमी करण्यासंदर्भात दिनांक ०२/०६/२०१५, दिनांक २३/०९/२०१५, दिनांक १७/११/२०१५ व दिनांक १६/०९/२०१६ च्या शासन आदेश/परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातसा प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२५) २१०३० (१९-०८-२०१६). श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.रामनाथ मोते, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील १४ आदिवासी पाड्यांमधील ४४४.७४ हेक्टर जमीन भातसा प्रकल्पासाठी बुडीत गेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भातसा प्रकल्पासाठी ज्या आदिवासींनी आपल्या जमिनी देऊन विस्थापित झाले, त्या प्रकल्पग्रस्तांचे ४७ वर्षानंतरही अद्याप पुनर्वसन झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांनी त्यांचे पुनर्वसन करण्याकरीता दिनांक ११ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास भातसा धरणावर आंदोलन करुन मुंबईचे पाणी केव्हाही तोडण्याचा इशारा स्थानिक कार्यालयाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विस्थापितांचे पुनर्वसन तसेच त्यांच्या मुलांना नोकरीत घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

भातसा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी एकूण १८ गांवे/पाड्यातील ४४४.७३ हे. आर खाजगी जमीन संपादित करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही. भातसा प्रकल्पासाठी भूसंपादनाची कार्यवाही सन १९६८-६९ मध्ये करण्यात आली होती. पूर्ण बुडीत क्षेत्रातील प्रकल्पबाधितांनी पुनर्वसनासाठी प्रस्तावित वन जमीन न स्विकारता पुनर्वसनाचा मोबदला रोख रकमेत स्विकारुन स्वत:चे पुनर्वसन स्वत: हून मौजे खुटघर, बिरवाडी, आढगाव, खैरे, इ. गावांमध्ये केले आहे.
(३) होय.

प्रकल्पग्रस्तांनी दिनांक ११ मे, २०१६ रोजी पाणी बंद आंदोलन व रस्ता रोको करणार असल्याचे दिनांक ५ मे, २०१६ च्या निवेदनात कळविले होते.
(४) कब्जेहक्काची रक्कम भरुन नियमानुसार पर्यायी जमीन मिळण्यासाठी भातसा प्रकल्पग्रस्तांनी अर्ज केलेले नाहीत. भातसा प्रकल्पातील ९६ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना शासन सेवेत सामावून घेण्यात आले आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार प्रकल्पग्रस्तांच्या नेमणूका स्पर्धा परीक्षेद्वारे व गुणवत्तेनुसार करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शीतपेये आरोग्यास हानीकारक असल्याबाबत**

**(२६) २१३३० (२३-०८-२०१६). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कडक उन्हाळा सुरु झाला की, सर्वसामान्यांची तहान भागविण्यासाठी बाजारपेठेत शीतपेयांची रेलचेल सुरु होत असते, परंतु सदरील शीतपेये ही आरोग्यास हानिकारक असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील शीतपेयांमुळे दात, मणके, कमरेची हाडे ठिसूळ होणे, तसेच मधुमेह, स्थूलत्व, हृदयरोग इत्यादी आजार उद्भवत असल्याचे सेंटर फॉर सायन्स इन दी पब्लिक इंटरेस्ट (सीएसपीआय) या केंद्राने अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती आरोग्यास हानिकारक असलेल्या शितपेयांवर आळा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
अशी कोणतीही बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयाकरीता महाझिंग्याचे उत्पादन वाढविण्यासह व्यवसाय वाढीकरीता बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) २१३९९ (१२-०८-२०१६). श्री.मितेश भांगडिया, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **मत्स्यविकास व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील मत्सोत्पादनाकरीता मत्स्यविकास विभागातर्फे व्यापक प्रसिध्दी व मत्स्य व्यवसायीकांशी प्रत्यक्ष संवाद होत नसल्याने मत्स्य विकास धोक्यात येत असल्याचे दिनांक १४ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जिल्हयात प्राणहिता, वैनगंगा, गोदावरी या नद्या असून यातील प्राणहिता व गोदावरी नदीच्या संगमामध्ये सिरोंचा भागात नैसर्गिकरित्या महाझिंग्याचे उत्पादन घेतले जात असून महाझिंग्याच्या उत्पादन वाढीकरीता मत्स्य विकास विभागाकडून कुठलीही तांत्रिक माहिती, मदत आणि विक्री वा व्यवसायाकरीता बाजारपेठ उपलब्ध नसल्याने उक्त उत्पादन बंद पडण्याच्या परिस्थितीत आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गडचिरोली जिल्हयाकरीता मत्स्य विकास विभागामार्फत विशेष कृती योजना कार्यान्वित करुन महाझिंग्याचे उत्पादन वाढविण्यासह व्यवसाय वाढीकरीता बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०४-१०-२०१६) :** (१) नाही, आत्मा योजनेअंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाकडून प्रशिक्षण सत्र राबवून संस्थांच्या चर्चासत्रात मत्स्यव्यवसाय संबंधी परिसंवाद आयोजित करुन मत्स्यव्यवसायिकांना तांत्रिक मार्गदर्शन नियमितपणे देण्यात येते.
(२) सिरोंचा भागातील संगमाच्या नदी पात्रात नैसर्गिकरित्या शिकारीद्वारे महाझिंग्याची मासेमारी करण्यात येते व स्थानिक सिरोंचा तालुक्यात बाजारपेठेत त्याची विक्री करण्यात येते. त्यामुळे बाजारपेठ उपलब्ध नाही, हे खरे नाही.
(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एमएसएमईडी ॲक्ट २००६ च्या कायद्याची अमंलबजावणी होत नसल्याबाबत**

**(२८) २१४४२ (१९-०८-२०१६). ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एमएसएमईडी ॲक्ट २००६ च्या अनुषंगाने लहान व मध्यमवर्गीय कंपन्याकडून मालाची खरेदी किंवा विक्री झाल्यानंतर त्याची देयक ४५ दिवसाच्या आत अदा करणे हे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१३-१०-२०१६) :** (१) अंशतः खरे आहे.

"सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम २००६" च्या कलम १८ (१) नुसार सुक्ष्म व लघु उपक्रमानी पुरवठा केलेल्या वस्तु/सेवा यांच्या प्रलंबित देयकाबाबत सुकरता परिषद यांच्याकडे याचिका दाखल करता येते. सुकरता परिषद अर्धन्यायिक स्वरुपाची कार्यवाही पूर्ण करुन अशा प्रकरणात निकाल/निर्णय देत असते. तथापि, सदर तरतुदी मध्यम उपक्रमास लागू नाहीत.

(२) सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ (२००६ चा २७) मधील कलम २१, पोटकलम (३) नुसार शासनाने विभागीय स्तरावर राज्यात एकूण ७ ठिकाणी सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषदा स्थापन केलेल्या आहेत. सदर परिषदांकडे प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार सुक्ष्म व लघु उपक्रमांनी पुरवठा केलेल्या वस्तु/सेवा यांच्या प्रलंबित देयकाबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार प्रलंबित रक्कम व दंडनीय व्याजाकरीता सुकरता परिषदेकडे याचिका करता येते.

सद्य:स्थितीमध्ये राज्यातील सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषदेकडे एकूण १३४६ प्रकरणे प्राप्त झालेली असून त्यापैकी एकूण ४२९ प्रकरणांमध्ये सुनावणी प्रक्रिया पुर्ण होऊन आदेश पारित करण्यात आलेले आहेत. राज्यातील सुक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषदेकडील सुनावणी प्रक्रिया नियमितपणे घेण्यात येत आहे.

(३) लागू नाही.

---

**कोराडी (नागपूर) येथील वीज निर्मिती केंद्रातून केबल चोरीला गेल्याबाबत**

**(२९) २१४७७ (१६-०८-२०१६). प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी (नागपूर) येथील वीज निर्मिती केंद्रातून केबल चोरीला गेल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर घटनेबाबत कोराडी पोलीस स्टेशन येथे दिनांक १८/०४/२०१६ रोजी भा.दं.वि. कलम ४२७ नुसार अदखलपात्र गु.क्र.२१२/१६ दाखल करण्यात आलेला आहे. तसेच कोराडी वीज निर्मिती केंद्राचे उप व्यवस्थापक (सुरक्षा) श्री.ए.एस.शुक्ला यांना निलंबित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा (जि.पुणे) येथील जयप्रकाशनगर मधील लक्ष्मी प्रोव्हिजन स्टोअर्समध्ये शीतपेयाच्या बाटलीमध्ये डास आढळल्याबाबत**

**(३०) २१४८६ (२३-०८-२०१६). ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येरवडा (जि.पुणे) येथील जयप्रकाशनगर मधील लक्ष्मी प्रोव्हिजन स्टोअर्स या किराणा मालाच्या दुकानातून अमित गायकवाड यांनी बुधवार दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी ओरो ऑरेंज खरेदी केलेल्या शीतपेयाच्या बाटलीमध्ये दोन डास आढळले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागरिकांच्या जीवाताशी खेळणाऱ्या कंपनीवर शासनाद्वारे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) दिनांक २७/०४/२०१६ रोजी अशी आशयाची तक्रार प्रशासनास प्राप्त झाली होती. परंतू तक्रारदाराने सदरची बाटली प्रशासनाच्या कार्यालयाकडे दिली नाही.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मे, लक्ष्मी प्रोव्हिजन स्टोअर्स, पुणे या पेढीची तपासणी करण्यात आली. तपासणी अहवालातील त्रुटींच्या अनुषंगाने त्यांचेविरुध्द तडजोड प्रकरण दाखल केले आहे. तसेच ओरो ऑरेंज या शीतपेयाचे उत्पादक मे.एजेई इंडिया प्रा.लि., खालापूर, रायगड या पेढीची दिनांक ०८/०७/२०१६ रोजी तपासणी करण्यात येऊन पेढी उत्पादन करीत असलेल्या अन्नपदार्थाचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. सदर सर्व नमुने प्रमाणित घोषित झालेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना अनुदानास पात्र करुन शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय देण्याबाबत**

**(३१) २१४९१ (२३-०८-२०१६). श्री.नागो गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्यात असलेल्या सन २००१ पुर्वीच्या कायमविना अनुदानित महाविद्यालयांना अनुदानास पात्र करुन शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय देण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण कायम विनाअनुदानित महाविद्यालय कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने दिनांक १३/०५/२०१४, २९/०७/२०१४ व ०५/०१/२०१६ रोजी शासनास निवेदन देऊन तसेच नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ०३ जून, २०१६ रोजी शासनास पत्र पाठवून विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महाविद्यालयांना अनुदानास पात्र करुन शिक्षक व कर्मचाऱ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली,

(३) नसल्यास, इतका प्रदीर्घ काळ विलंब लागण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) शासनाने शैक्षणिक वर्ष २००१-०२ पासून कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्याचे धोरण अवलंबिलेले असून त्यानुसार मान्यता देण्यात येत आहे.

---

**राज्यात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान बंद करुन जुन्या योजनेचे नव्याने स्वच्छ भारत अभियान सुरु केल्याबाबत**

**(३२) २१६२१ (२३-०८-२०१६). श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागात वैयक्तिक शौचालय उभारण्यास प्राधान्य दिले जात असले तरी अद्यापही राज्यातील ३४ जिल्ह्यामध्ये ४५,२३,३९२ कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय तर पुणे जिल्ह्यात एक लाख दहा हजार १९ कुटुंबाकडे शौचालय नसल्याचे तसेच वैयक्तिक शौचालय बांधण्यात पुणे जिल्हा राज्यात १६ व्या क्रमांकावर असल्याचे केलेल्या सर्वेक्षणातून नुकतेच आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून अनेक गांवे हगणदारी मुक्त झाली असतानाही संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान बंद करुन जुन्या योजनेचे नव्याने स्वच्छ भारत अभियान सुरू करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, जुन्या योजनाचे नामकरण केल्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीमध्ये किती गुणात्मक फरक पडला याची पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर (१५-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये माहे ऑगस्ट, २०१६ अखेरपर्यंत ४५,१९,११५ कुटुंबांकडे शौचालय नाही. तर पुणे जिल्ह्यात माहे ऑगस्ट, २०१६ अखेरपर्यंत एकूण ८५,५६८ कुटुंबांकडे शौचालय उपलब्ध नाहीत. एकूण शौचालय असलेल्या कुटुंबांच्या संख्येमध्ये पुणे जिल्हा पाचव्या क्रमांकावर असून टक्केवारीमध्ये पुणे जिल्हा पाचव्या क्रमांकावर आहे.

(२) स्वच्छ भारत अभियान हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान हा राज्य शासनाचा पुरस्कार स्वरुप कार्यक्रम आहे. संत गाडगेबाबा अभियान बंद केलेले नसून सदर अभियान राज्यात सुधारीत स्वरुपात राबविण्यात येत आहे. तसेच स्वच्छ भारत अभियान याचीही अंमलबजावणी राज्यात सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांची चौकशी करण्याबाबत**

**(३३) २१६५७ (२३-०८-२०१६). श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील पाणी पुरवठा योजनांची चौकशी ठाणे जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा योजनेतील निदर्शनास आलेल्या गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी माहे मे, २०१६ च्या पहिल्या वा दुसऱ्या आठवड्यात घोषणा केल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यातील किती व कोणकोणत्या पाणी पुरवठा योजनांची चौकशी मंत्री महोदयांच्या आदेशानुसार सुरू करण्यात आली आहे,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्ती व अधिकाऱ्यांविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०५-१०-२०१६) :** (१) होय.

(२) उस्मानाबाद जिल्ह्यातील भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत समाविष्ट असलेल्या एकूण ११९ योजनांची चौकशी करण्यात आली आहे. त्यापैकी आर्थिक अनियमितता आढळून आलेल्या ४० योजनांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| तालुका | योजनांची एकूण संख्या | आर्थिक अनियमितता आढळून आलेल्या योजनेचे नाव |
|---|---|---|
| उस्मानाबाद | २४ | भानसगांव, बोरगांव राजे, जूनोनी, म्होतरवाडी, शेकापूर, वडगांव (शि.), वाघोली-७ |
| कळंब | २५ | बहुला, लमाण ता.शिराढोण, नागझरवाडी, पाडोळी ना., गोली, शिराढोण, कोथळा-७ |

| | | |
|---|---|---|
| तुळजापूर | २९ | आरळी बु., आपसिंगा, चिकुंद्रा, ढेकरी, गंधोरा, गुळहळ्ळी, घट्टेवाडी, निलेगांव, सिदफळ-९ |
| लोहारा | ७ | तावशीगड चिरकापाटी, मोघा खु., नागराळ लोहारा-३ |
| उमरगा | ११ | गुगळगांव व वाडी, एकुरगा वाडी, वरणाळवाडी, कोळसर गुंजोटी जाधव तांडा, तुगांव, भुसणी-६ |
| भूम | ८ | माणकेश्वर, अंबो-२ |
| परंडा | १३ | गोसावीवाडी, लोणी वस्त्या, देवगांव बु., हिंगणगांव खु, कुकडगांव-५ |
| वाशी | २ | घोडकी व वस्त्या-१ |
| एकूण | ११९ | एकूण-४० |

चौकशी करण्यात आलेल्या ११९ योजनांचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

१) चौकशी करण्यात आलेल्या योजनांची संख्या ११९ योजना

२) चौकशीमध्ये आर्थिक अनियमितता आढळून आलेल्या ४० योजनांपैकी २३ योजनांची पूर्णत: व ५ योजनांची अंशत: अशी एकूण रुपये ५२.३५ लक्ष वसूली करण्यात आलेली आहे. उर्वरित १२ योजना पूर्णत: व उपरोक्त ५ अंशत: योजनांची वसुलपात्र रक्कम रुपये ४३.१३ लक्ष एवढी वसूली झालेली नाही. त्यामुळे सदरील योजनांच्या अध्यक्ष/सचिव ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांचेकडून वसुलपात्र रक्कम वसुली करणेबाबत कार्यवाही सुरु आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बदनापुर (जि.जालना) तालुक्यात कृषि हवामान केंद्राची उभारणी करणेबाबत**

**(३४) २१८०९ (१२-०८-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय कृषि **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांनी बदनापूर (जि.जालना) येथे कृषि हवामान केंद्र स्थापन करण्यासाठी ३ वर्षापूर्वी शासनाकडे प्रस्ताव दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृषि हवामान केंद्र स्थापन करण्यासाठी रु.७० कोटीची आवश्यकता असुन तत्कालीन प्रधान सचिव, कृषि यांनी याबाबतीत बैठक घेतली परंतु अद्याप त्यावर कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बदनापुर (जि.जालना) येथे कृषि हवामान केंद्र स्थापन केल्यास त्याचे कवरेज संपुर्ण मराठवाड्यात राहील व मराठवाड्यातील शेतकऱ्यांना गारपीट, पाऊस, वादळ, तापमान व पिकांवरील रोगराईची पुर्व कल्पना मिळण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठवाड्यातील दुष्काळाचा व बदलत्या हवामानाचा अचुक अंदाज घेण्यासाठी बदनापुर (जि.जालना) येथे कृषि हवामान केंद्र स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०५-१०-२०१६) :** (१) होय.
(२), (३) व (४) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचा बदनापूर, जिल्हा जालना येथे स्वतंत्र हवामान संशोधन केंद्र स्थापण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी अमान्य करुन त्याऐवजी सध्याच्या हवामान संशोधन केंद्राच्या अत्याधुनिकीकरणाचा प्रस्ताव राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत संपूर्ण राज्यात महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करण्याची कार्यवाही सुरु झाली असून त्याद्वारे हवामान विषयक प्राप्त होणारी माहिती (Weather Data) विद्यापीठाला उपलब्ध होईल. मराठवाड्यात केवळ एकाच ठिकाणाऐवजी प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर हवामान केंद्राची उभारणी झाल्याने विविध भागातील हवामान परिस्थितीनुसार प्राप्त होणाऱ्या अचूक माहितीचा वापर विद्यापीठातील शास्त्रज्ञ संशोधन कार्यासाठी करु शकतील ही बाब लक्षात घेता, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या स्वतंत्र हवामान संशोधन केंद्र उभारण्याच्या प्रस्तावाची आवश्यकता राहत नसल्याबाबत विद्यापीठास कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमळनेर, एरंडोल (जि.जळगांव) तालुक्यात बोगस बियाणांची खोटी जाहिरात करून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(३५) २२१२२ (१२-०८-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय कृषि **मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर, एरंडोल (जि.जळगांव) तालुक्यात बोगस बियाणे कंपनीचे एजंट कार्यरत असून ते कृषि केंद्रावर जाऊन खोट्या जाहिराती देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बोगस बियाणांची खोटी जाहिरात करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०५-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

अमळनेर, एरंडोल तालुक्यात असे प्रकरण निदर्शनास आलेले नसून भुसावळ, जामनेर व चाळीसगाव तालुक्यात माहे जून-२०१६ च्या सुमारास आढळून आले आहे.

(२) भुसावळ, जामनेर व चाळीसगाव तालुक्यात बनावट देशी संकरीत कापूस बियाणांची विक्री कृषि केंद्र चालकांमार्फत करुन शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याची बाब निदर्शनस आली आहे. प्रस्तुत प्रकरणी ३ जणांना अटक करण्यात आली असून यासंदर्भात पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच बनावट बियाणे विक्रीत सहभाग असल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे तीन केंद्र चालकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत**

**(३६) २२१२९ (१९-०८-२०१६). श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत शासनाने सन २००६ मध्ये ३१९ केंद्रीय आश्रम शाळांना मान्यता दिली असून सन २०१५ मध्ये झालेल्या तपासणी दरम्यान ३१९ शाळांपैकी १०७ आश्रमशाळा अनुदानास पात्र असून त्यांना अद्याप अनुदान दिले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीच अनुदानास पात्र असलेल्या १०७ तसेच उर्वरित २१७ आश्रमशाळांना व इतर आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१४-१०-२०१६) :** (१) व (२) केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत केंद्र शासनाचे अनुदान मिळण्यासाठी आजतागायत सुमारे ३१९ आश्रमशाळांना राज्य शासनाची कायम विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आलेली असून सदर आश्रमशाळांचे प्रस्ताव अनुदान मंजुरीसाठी केंद्र शासनास पाठविण्यात आले आहेत. त्यापैकी फक्त ३४ आश्रमशाळांना केंद्र शासनाने अनुदान मंजूर केले असून उर्वरीत आश्रमशाळांना केंद्र शासनाने अद्याप अनुदान मंजूर केलेले नाही.

तथापि, सदर आश्रमशाळांना राज्य शासनाकडून अनुदान मिळणेबाबत विविध लोकप्रतिनिधी, संस्था व व्यक्ती यांचेकडून मागणी होत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयातील कृषि विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३७) २२१३९ (१२-०८-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील कृषि विभागात विविध संवर्गातील १२०० पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा विभागात एवढया मोठया प्रमाणात रिक्त पदे असल्याने मराठवाडयातील ५० लाख शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मराठवाडा कृषि विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१५-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे देवून कामकाज पार पाडण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद) येथील प्राचार्य/प्राध्यापक नेमणुकास मान्यता देऊन वेतन यादीत नावाचा समावेश करण्याबाबत**

**(३८) २२१५३ (२३-०८-२०१६). श्री.सतिश चव्हाण, श्री. अमरसिंह पंडित, श्री. विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद संलग्नीत महाविद्यालयातमध्ये प्राचार्य, प्राध्यापक यांच्या नेमणूका संस्था सर्व नियमाप्रमाणे कार्यवाही करुन नेमणुका करते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेनी अशा नेमणुका केल्यानंतर महाविद्यालयाच्या अनुदानित पगार पत्राकात नोंदणी करणेसाठी मा.सह संचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद यांचे कडे प्रस्ताव दाखल करतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा नेमणुका केलेल्या, प्राचार्य/प्राध्यापक यांच्या संचिकेवर वर्षानुवर्षे निर्णय घेतले जात नसल्याने संबंधितांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राचार्य/प्राध्यापक यांच्या संस्थैने केलेल्या नेमणुकीस त्वरीत मान्यता देऊन पगार यादीत नाव समावेश करण्याची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

(४) नियमानुसार नेमणुका केलेल्या अशा प्रकरणांवर त्वरीत कार्यवाही करण्यात येऊन पगार यादीत नाव समाविष्ट करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्हयातील धाड परिसरातील जंगलातील अवैध वृक्षतोड रोखण्याबाबत

**(३९) २२१९२ (१९-०८-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील धाड परिसरातील जंगलामध्ये अवैध वृक्षतोड सुरु असून रानमेवा, करवंदे, चिघोर, टेंभुर्णी ही मौल्यवान वनस्पतींची झाडे नामशेष होत असल्याने जंगलच नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०१६) :** (१) धाड परिसरामध्ये माहे मे, २०१६ च्या सुमारास रानमेवा, करवंदे, चिघोर, टेंभुर्णी सारख्या मौल्यवान झाडांती तोड निदर्शनास आली नाही.

तथापि, बुलडाणा परिक्षेत्रामध्ये माहे मे, २०१६ व जुन, २०१६ मध्ये घडलेल्या सागवानाच्या अवैध वृक्षतोडीच्या वनगुन्ह्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | महिना | वनगुन्हे संख्या | सागवान वृक्ष संख्या | घ.मी. | नुकसानी किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे, २०१६ | १ | १४ | ०.२८२ | १३१२२ |
| २ | जुन, २०१६ | १ | ९ | ०.१२६ | ५८८३ |

(२) अवैध वृक्षतोडील पायबंद घालण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत :-

- वनक्षेत्रात क्षेत्रिय कर्मचाऱ्यांमार्फत नियमितपणे गस्त घालण्यात येते.
- नियमितपणे बिट तपासणीचा कार्यक्रम राबविला जातो.
- अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीची मदत घेतली जाते.

(३) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात दुष्काळ निवारणार्थ जागतिक बँकेकडून निधी मिळण्याबाबत

**(४०) २२२१९ (१९-०८-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात निर्माण झालेला दुष्काळ निवारणार्थ शासनाने रूपये ४ हजार कोटींची मागणी जागतिक बँकेकडे केल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने केलेल्या मागणीनुसार जागतिक बँकेकडून शासनाला किती निधी मिळाला आहे,

(३) असल्यास, जागातिक बँकेकडून मिळालेल्या निधीच्या वापराचा संपूर्ण तपशील काय आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अमडापूर (जि.बुलडाणा) येथील नळ योजनेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(४१) २२२५० (२३-०८-२०१६). श्री.सुभाष झांबड, ॲड.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमडापूर (जि.बुलडाणा) येथील ब्राम्हणवाडा धरणावरून नळयोजनेसाठी रुपये ४ कोटी ९५ लाख एवढा निधी उपलब्ध करून सन २०११ मध्ये या नळयोजनेचा शुभारंभ करण्यात आला, परंतू ३ कोटी रूपयांचा निधी जिल्हापरिषदेकडून न मिळाल्याने नळयोजनेचे काम संथगतीने सुरू असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नळ योजनेसाठी निधी उपलब्ध करून या कामाला गती देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही. सदर नळ योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(२) सदर योजनेसंदर्भात ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस आतापर्यंत ५,६०,५१,६८३/- एवढा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. जिल्हा परिषद, बुलडाणा यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात शासनामार्फत वितरीत करण्यात आलेल्या रुपये ४.५० कोटी एवढ्या निधीतून जिल्हा परिषदेमार्फत समितीस निधी वितरीत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गुजरातच्या धर्तीवर राज्यात सौर वीज पंप बसविण्याबाबत

**(४२) २२२९६ (१६-०८-२०१६). श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे ॲड.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुजरात, आंध्रप्रदेशमध्ये कमी दराने सौर वीजपंप बसविण्यात येत असताना राज्यातील सौर पंप अधिक गुणवत्तापूर्ण व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य असल्याचा दावा करीत सदर सौरपंप खरेदी योजनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय ऊर्जा विभागाने घेतल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरातच्या धर्तीवर सदर योजना राज्यात राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर योजना गुजरातच्या धर्तीवर न राबविता शासनाने शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१४/प्र.क्र.२१९/ऊर्जा-७, दिनांक २७ मार्च, २०१५ अन्वये सौर कृषि पंप आस्थापित करण्याचे धोरण जाहिर केले आहे त्यानुसार योजना राबविण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रशासकीय कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४३) २२३२८ (१९-०८-२०१६). श्री.संजय दत्त, ॲड..रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १८८ ठिकाणच्या प्रशासकीय कार्यालयीन इमारतींच्या अपूर्ण बांधकामास निधी उपलब्ध करून प्रत्येक जिल्ह्यातील प्रशासकीय कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध करण्यात येतील असे आश्वासन मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी विधीमंडळ सभागृहात माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक जिल्ह्यात प्रशासकीय कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून याबाबतचा बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१६) :** (१) होय.
(२) राज्यात शासनाच्या प्रशासकीय इमारतीचे एकात्मिक नियोजन व बांधकाम करण्यासाठी शासनाने शासन परिपत्रक क्र.वानियो/१०८९/८-व/योजना-१ दिनांक १२ जुलै, १९९० नुसार मार्गदर्शक तत्वे ठरवून दिली आहेत.

सदर धोरणाच्या अंमलबजावणीची सुरुवात म्हणून सद्य:स्थितीत तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत या हेतुने शासनाने आखलेल्या नियोजनबध्द कार्यक्रमांतर्गत १८४ तालुक्याच्या ठिकाणी मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे काम मंजूर आहेत.

इतर ठिकाणी प्रशासकिय इमारतीची कामे घेण्याबाबत मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे. ही कामे जागेची उपलब्धता, प्राथम्यक्रम व उपलब्ध नियतव्ययाच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने अर्थसंकल्पीत करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**द्वार पोहोच योजनेत काम करणाऱ्या वाहनचालकांना**
**विम्याची रक्कम व इतर सुविधा मिळणेबाबत**

**(४४) २२५७९ (१६-०८-२०१६). श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १७४६६ ला दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) द्वार पोहोच योजनेअंतर्गत सन १९९८ पासून महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाची अधिकर्ता संस्था म्हणून शासनाने नियुक्ती करणे व या संस्थेने धान्य वाहतुकीसाठी नियुक्त केलेल्या ठेकेदारांनी नियमाप्रमाणे वाहन चालकांना विमा, पी.पी.एफ. व इतर सुविधा दिल्या नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन चालकांना ठेकेदारांनी सुविधा दिल्याची शहानिशा संबंधित अधिकाऱ्यांनी न केल्यामुळे सन १९९८ पासून वाहनचालकांना अशा सुविधांपासून वंचित रहावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द व वाहनचालकांना पी.पी.एफ.सह इतर सुविधा न देणाऱ्या ठेकेदारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) संबंधित ठेकेदारांच्या देय रकमा रोखून ठेवल्या आहेत. तसेच सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती, भटक्या जमातींच्या आश्रमशाळेतील शिक्षकांना प्रशिक्षित**
**शिक्षकांची वेतनश्रेणी (बी एड) देण्याबाबत**

**(४५) २२६३३ (१६-०८-२०१६). श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हापरिषद व खाजगी प्राथमिक शाळेतील कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांना प्रशिक्षित समजून नियुक्ती दिनांकापासून पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी (बी एड) देण्यात यावी, या शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ च्या शासननिर्णयानुसार अनुसूचित जाती, भटक्या जमातींच्या आश्रमशाळेतील शिक्षकांनाही हे लाभ देण्याबाबत शासन आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी वित्तीय तरतूद करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१३-१०-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील विजाभज आश्रमशाळेतील शिक्षकांना प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी (बी.एड) देण्याबाबत दिनांक २८/०४/२०१४ चा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

तथापि, अनुसूचित जाती प्राथमिक आश्रमशाळांमधील शिक्षकांना प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

(२) नियमित लेखाशीर्षाखाली प्राप्त होणाऱ्या तरतुदीतून खर्च भागविण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आश्रमशाळा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती देण्याबाबत**

**(४६) २२६३४ (१६-०८-२०१६). श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक १८७६८ ला दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यातील विमुक्त जातीच्या आश्रम शाळेतील कार्यरत लिपिक / सेवक /कांमाठी / स्वयंपाकी / वसतिगृह / अधिक्षक / प्रयोगशाळा सहायक / परिचर / नाईक इत्यादी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर कालबध्द पदोन्नती देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या निर्णयानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश शासन पत्र दिनांक १०/०३/२०१६ नुसार दिलेले आहेत.

---

**पालघर जिल्हयात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) नसल्याबाबत**

**(४७) २२७३८ (२३-०८-२०१६). श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयाची निर्मिती होवून दोन वर्षाचा कालावधी पूर्ण होवूनही जिल्हयात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) अस्तित्वात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हयातील अध्यापक विद्यालयांचा सर्व कारभार डायटमार्फत चालत असल्यामुळे प्राचार्य, प्रशिक्षणार्थी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी इत्यादींना बेलापूरपासून ३० कि.मी. अंतरावर असणाऱ्या रहाटोली येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पालघर जिल्हयात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) किती कालावधीत अस्तित्वात येईल,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मा.जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडे शासकीय जागा उपलब्ध होणेसाठी पाठपुरावा चालू असुन जागा उपलब्ध होताच या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) पालघर मुख्यालयाच्या ठिकाणी शासकीय जागा उपलब्ध होत नसल्यामुळे डायट स्थापनेस विलंब होत आहे.

---

**परभणी शहरातील वांगी रोड परिसरातील शेतात असलेल्या गोदामातून अन्न व औषध प्रशासन विभागाने गुटखा जप्त केल्याबाबत**

**(४८) २२७९७ (२३-०८-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील वांगी रोड परिसरातील शेतात असलेल्या गोदामातून अन्न व औषध प्रशासन विभागाने दिनांक ३ मे, २०१६ रोजी केलेल्या कारवाईत रुपये ९ लाख ६० हजार इतका गुटखा जप्त केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने गुटख्याचा साठा करणाऱ्यांवर कारवाई कोणती केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी परभणी ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये आरोपी विरुध्द गुन्हा क्र.१६२/२०१६ दिनांक २२/०७/२०१६ रोजी दाखल करण्यात आला असून मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, परभणी यांचे न्यायालयात खटला क्र.३११/२०१६ दिनांक ३०/०७/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दुध भेसळ रोखण्याबाबतचे यंत्र ग्राहकांना वितरीत करण्याबाबत**

**(४९) २३१०१ (२३-०८-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुधातील भेसळ ओळखण्याबाबतचे यंत्र डीफेन्स फूड रिसर्च प्रयोगशाळेने विकसित केल्याचे नुकतेच निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे यंत्र ग्राहकांना वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदरहू निर्णय केव्हा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-१०-२०१६) :** (१) दूधातील भेसळ ओळखण्याबाबतचे यंत्र डीफेन्स फूड रिसर्च प्रयोगशाळेने विकसित केल्याचे इंटरनेटवरील माहितीवरुन निदर्शनास आले आहे. परंतु डीफेन्स फूड रिसर्च प्रयोगशाळेतर्फे अधिकृतरीत्या अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास सदर बाब आणण्यात आलेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील १२३ तालुक्यांवर ओढवलेल्या भीषण दुष्काळाचे निवारण करण्यासाठी ३ हजार ७६१ कोटींच्या पॅकेजची केलेली मागणी**

**(५०) ३३२९६ (१२-१०-२०१२). श्री.धनंजय मुंडे, श्री. अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १२३ तालुक्यांवर ओढवलेल्या भीषण दुष्काळाचे निवारण करण्यासाठी ३ हजार ७६१ कोटींच्या पॅकेजची मागणी मा.मुख्यमंत्र्यांनी केंद्राकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीनुसार राज्याला केंद्राकडून पॅकेज मंजूर झाले आहे काय,
(३) असल्यास, किती कोटींचे पॅकेज राज्याला मंजूर झाले आहे व त्याचे वाटप कधीपर्यंत करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०९-२०१६) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.
सन २०११-१२ मध्ये राज्य शासनाने दुष्काळ निवारणाकरिता रुपये १५८५.७० कोटी इतका खर्च केला आहे. तर केंद्र शासनाकडून सन २०११-१२ मध्ये ५७४.७१ कोटी इतका निधी खर्च केला आहे. तसेच सन २०१२-१३ मध्ये राज्य शासनाने दुष्काळ निवारणाकरिता रुपये ९७५.०१ कोटी इतका खर्च केला आहे. तर केंद्र शासनाकडून सन २०११-१२ मध्ये १२७८.८१ कोटी इतका निधी खर्च केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.